MAM.

62

'Dr. S. S. LIMAYE

0712-2582237 (34)

ATTN: SHULKA SAMITI
'A' Grade to Ramdeobaba
K. N. Engg. College, Nagpur "

**ANNEXURE B1**

राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे
गुणात्मक व दर्जानिहाय वर्गीकरण

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२००४/(२९९/०४)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ जुलै, २००४

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
क्र.पीईसी-२००३/(२१२/०३)/तांशि-१, दि.१९ ऑगस्ट,२००३
२) संचालक तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांचे
क्र.२/एनजीसी/२००४/दर्जानिहाय वर्गीकरण/२३०७,दिनांक८ जून,
२००४ चे पत्र.

**शासन निर्णय :-** सन २००३-०४ पासून दोन वर्षासाठी राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे गुणात्मक आणि दर्जानिहाय वर्गीकरणास संदर्भाधीन दिनांक १९ ऑगस्ट,२००३ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. यामधील ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांना "ब" "ड" "ई" दर्जा देण्यात आला आहे अशा संस्थांनी वसेच ज्या संस्थांचा दर्जा प्रसिध्द करण्यात आलेला नाही त्या संस्थांनी जर पुढील शैक्षणिक वर्ष २००४-०५ साठी, त्यांच्या संस्थेचे दर्जानिहाय वर्गीकरण करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे पुन्हा अर्ज केल्यास व शासनाने विहीत केलेले शुल्क भरल्यास त्यांना दर्जा उंचावण्यास पुन्हा संधी देण्यात येईल. असे स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन संदर्भाधीन दि.१९ ऑगस्ट,२००३ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट " अ " मधील विभागीय कार्यालय, मुंबई येथील अनुक्रमांक-१२ व विभागीय कार्यालय, नागपूर येथील अनुक्रमांक ७ मध्ये दर्शविलेल्या संस्थांनी दर्जा उंचावण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अर्ज केले होते. तसेच २ महाविद्यालयांनी प्रथमच दर्जानिहाय वर्गीकरणासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अर्ज केला होता. या चार महाविद्यालयांची तंत्रशिक्षण संचालनालयाने तपासणी करुन संचालनालय स्तरावर समिती गठीत करुन, त्यांनी संबंधित ४ संस्थांना जो सुधारीत दर्जा दिला आहे त्यास शासनाकडून मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये खालील ४ संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारीत दर्जा देण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.:-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | यापूर्वी संस्थेला दर्जा मिळाल्याचे वर्ष व मिळालेला दर्जा | सुधारीत दर्जा |
|---|---|---|---|
| १. | विद्यावर्धिनिचे कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, वसई, मुंबई | " क " दर्जा २००३ | " अ " दर्जा |
| २. | रामदेव बाबा कमला नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर | " ब " दर्जा २००३ | " अ " दर्जा |

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT ★ NAGPUR

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री.विठ्ठल एज्युकेशन रिसर्च इन्स्टिट्यूटचे कॉलेज ऑफ इंजि., ता.पंढरपूर, जि.सोलापूर | -- | " अ " दर्जा |
| ४. | पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी पिंपरी, पुणे | -- | " अ " दर्जा |

मात्र सदर दर्जा हा २००४-०५ पासून दोन वर्षासाठी राहील तसेच संस्थांना प्रदान करण्यात आलेल्या दर्जाचे पुनर्विलोकन दर २ वर्षानंतर करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्या. र. चौरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
[illegible]
निवड नस्ती तांशि-१

प्रत,
१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्टेडियम परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००
२) सहाय्यक शिक्षण सल्लगार (तांत्रिक) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इन्स्युरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र /एचएमसीटी /एमबीए/ एमसीए/ पीजीडीएम महाविद्यालयातील व्यवस्थापनातील द्विपदवी अभ्यासक्रम अणि इंटीग्रेटेड अभ्यासक्रमास शासन मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः टिईएम-२०१३/(प्र.क्र. १८८)/तांशि-४,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

तारीख: १५ मे, २०१३

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/२०१३/६३१,दिनांक १४.०५.२०१३.

२) शासन निर्णय क्रमांकः शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक MIS-२०१२/(CR ६५)/TE-४, दिनांक २९.०१.२०१३

३) शासन निर्णय क्रमांकः शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक MIS-२०१३/(CR ८४)/TE-४,दिनांक २८.०३.२०१३.

प्रस्तावना -

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / एचएमसीटी / एमबीए/ एमसीए / पीजीडीएम महाविद्यालयातील द्विपदवी अणि इंटीग्रेटेड अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी राज्यात सुरु असलेल्या खाजगी विनाअनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र / एचएमसीटी / एमबीए / एमसीए / पीजीडीएम महाविद्यालयातील द्विपदवी अणि इंटीग्रेटेड अभ्यासक्रमास मान्यता दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्ट - १, २, ३, ४ व ५ मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार द्विपदवी अणि इंटीग्रेटेड अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT NAGPUR

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेशक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

९) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादी बाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR